अपील अधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org
अपिल क्र. २३/२०१९
जा.क्र उआ (सा.प्र.)/ ५२८६ दि. ०५/१०/२०१९

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त (सामान्य प्रशासन) पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/२३/२०१९

**श्री गणेश रघुनाथ भिसे**
प्लॉट नं. १८, स. नं. २४३/३ बाणेर,
मेडीपॉइन्ट हॉस्पिटल जवळ,
औंध, पुणे ४११०६७ ------------------ अपिलार्थी

विरुद्ध

**जन माहिती अधिकारी**
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(१) अन्वये अपिल**

**श्री गणेश रघुनाथ भिसे** रा. प्लॉट नं. १८, स. नं. २४३/३ बाणेर, मेडीपॉइन्ट हॉस्पिटल जवळ, औंध, पुणे ४११०६७ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांचेकडे दि. ०५.०७.२०१९ रोजी अर्ज करून "अर्जामध्ये नमूद (अ), (ब) (क) अनधिकृत बांधकाम या विषयावरील आज्ञापत्र, व शासन परिपत्रक यांच्या सर्टिफाईड प्रती मिळणे" बाबत माहिती मागितलेली होती.

अपिलार्थी यांचे मुळ अर्जातील माहिती बाबत जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र. जमाअ/आस्था/३६३२ दि. ०९.०८.२०१९ अन्वये अर्जास उत्तर दिले आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अंपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| ५.०७.२०१९ | ५.०७.२०१९ | ०३.०८.२०१९ | ०९.०८.२०१९ | ६ |

अपिलार्थी यांनी "माहिती मिळाली नाही, अपूर्ण माहिती मिळाली " असे नमूद करून अपील क्र. २३/२०१९ चा अपील अर्ज दि. १६.०९.२०१९ रोजी दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| १६.०९.२०१९ | १६.०९.२०१९ | ७.०९.२०१९ | नाही<br>विलंब ९ दिवस | होय |

सदर प्रकरणी दि. ०३.१०.२०१९ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आलेली होती. सदर सुनावणीस अपिलार्थी **श्री गणेश रघुनाथ भिसे** रा. प्लॉट नं. १८, स. नं. २४३/३ बाणेर, मेडीपॉइंन्ट हॉस्पिटल जवळ, औंध, पुणे ४११०६७ हे उपस्थित होते. **श्री चेतन कबाडे**,जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा हे उपस्थित होते.

**विवेचन**

**श्री.चेतन कबाडे**,जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थीस जा.क्र. जमाअ/आस्था/३६३२ दि. ०९.०८.२०१९ अन्वये उत्तर दिले आहे, असे प्रतिपादन केले.

## आदेश

जन माहिती अधिकारी आस्थापना विभाग, पुणे मनपा यांनी अपिलार्थी यांना त्यांचे वरील विवेचन मध्ये नमूद केल्यानुसार माहिती १५ दिवसात विनामुल्य उपलब्ध करून द्यावी. अपील क्र. २३/२०१९ निकाली काढण्यात येत आहे.

(अनिल मुळे)
अपिलीय प्राधिकारी
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका